# सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामाकरीता.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/११ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ दि.१७/१२/२०१६ अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त उप विभागीय अभियंता /अधिकारी यांना करार पध्दतीने दक्षता पथक कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील बांधकाम संबधीत कामाचे तांत्रिक परिक्षण करण्यास्तव नेमणुक करावयाची आहे. जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त उप विभागीय अभियंता /अधिकारी यांची नेमणुक करार पध्दतीने अकरा (११) महिन्यासाठी राहील. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची सेवा दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, जलसंपदा विभाग, अमरावती अधिनस्त कामासाठी राहील. सेवानिवृत्त उप विभागीय अभियंता /अधिकारी यांना सिंचन व विविध बांधकामाचा अंमलबजावणीचा अटीमध्ये नमुद केल्याप्रमाणे पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, जलसंपदा विभाग, अमरावती यांचे कडे दि.१०/०८/२०१९ (सायं. ५.०० वा. पर्यंत) प्राप्त होईल या बेताने पोष्टाद्वारे सादर करावीत किंवा कार्यालयात प्रत्यक्ष द्यावीत. अर्जाचे पाकीटावर “सेवानिवृत्त उप विभागीय अभियंता /अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामाकरीता घेण्याबाबत” असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नांव लिहण्यात यावे. नियोजीत दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. करार पध्दतीने नेमणुकीच्या अटी शर्ती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/११ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ दि.१७/१२/२०१६ अनुसार राहतील सदर शासन निर्णय शासनाचे वेबसाईटवर उपलब्ध आहे.

## सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबत खालील सर्व साधारण अटी व शर्ती लागु राहतील

१) करार पध्दतीवर नेमणुकी करीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे वय ६२ वर्षापेक्षा अधिक नसावे.

२) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यास ज्या पदासाठी अर्ज केले आहे. त्या कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्या विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र घेवुन अर्जासोबत सादर करावे.

४) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत शासकिय वैद्यकिय अधिकाऱ्याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे.

५) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबधीत कार्यालयाकडुन प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करावे, तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपुर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.

६) सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावुन घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यांत यावा.

७) नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/११ दि.१७/१२/२०१६ मधील (ड) मासीक परिश्रमीक व भत्ते यामध्ये असलेल्या तरतुदीनुसार देय राहील.

८) नियुक्ती प्राधिकारी (अधीक्षक अभियंता) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

१०) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन जबाबदार राहनार नाही.

११) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूण दिलेली कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबधीत व्यक्तीची राही व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडुन घेण्यात येईल.

१२) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कुटुंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत.

१३) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.

१४) सदर नेमणुक ही फक्त ११ महिनेसाठी राहील.

१५) मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती यांचे सुचना व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेलवर कळविण्यात येईल.

जाहिरात प्रसिध्दी व निवड प्रक्रियेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्द करण्याचा दिनांक | :- दि.१७/०७/२०१९ |
| २. | सदर पदाकरीता अर्ज स्विकृतीचा कालावधी | :- दि.१८/०७/२०१९ ते १०/०८/२०१९ |
| ३. | अर्ज छाननी करण्याचा कालावधी | :- दि.१३/०८/२०१९ ते १४/०८/२०१९ |
| ४. | मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी सुचना फलकावर प्रसिध्द दिनांक | :- दि.१७/०८/२०१९ |
| ५. | मुलाखतीचा दिनांक | :- दि.२०/०८/२०१९. |

उपरोक्त ०१ ते १४ अटी व शर्ती मला मान्य आहेत हयाबाबतचे अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

# कंत्राटी तत्वावर भरावयाचा पदांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षीत कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन निवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | उपविभागीय अभियंता / अधिकारी | क्षेत्रिय कार्यालयातील तांत्रिक तपासणी व तांत्रिक परिक्षण अहवाल | सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता / अधिकारी |

सदर नेमणुकी करीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा हया वेबसाईटवर https://wrd.maharashtra.gov.in चे मुख्य पृष्ठावर उपलब्ध आहेत. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, जलसंपदा विभाग, अमरावती या कार्यालयात संबधीत कार्यकारी अभियंता यांचेकडे उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव व पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, जलसंपदा विभाग, अमरावती, शिवाजी नगर, उर्ध्व वर्धा वसाहत, अमरावती | ०७२१ - २६६२३४६ |

# विहीत नमुन्यातील अर्ज

# पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट

उपविभागीय अभियंता / अधिकारी या पदासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा विविध कामाकरीता करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबतचाअर्ज.

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता,
दक्षता पथक, अमरावती परिमंडळ,
जलसंपदा विभाग, अमरावती

| |
|---|
| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

अर्ज केलेल्या पदाचे नाव :- ------------------------------------------------------

(१) अर्जदाराने नाव :-

(२) कायमचा पत्ता :-

(३) दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनीसह (अनिवार्य) :-

(४) ई-मेल (अनिवार्य) :-

(५) सध्याचा पत्ता :-

(६) जन्मतारीख :-

(७) राष्ट्रीयत्व :-

(८) प्रवर्ग :-

(९) लिंग :- पुरुष / महिला

(१०) अवगत भाषा :-

(११) शैक्षणिक माहिती :-

| अ.क्र. | परिक्षा | वर्ष | विषय | शाळा / कॉलेजचे नाव | बोर्ड / विद्यापिठ | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(१२) इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी) :-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रयोजक) नाव | मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१३) अनुभव :-

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१४) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

(१५) सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल :-

मला पुर्णपणे माहिती आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाचे तांत्रिक परिक्षण करणे करीता सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी उपविभागीय अभियंता / अधिकारी या पदाकरीता उमेदवांराची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे तांत्रिक कामाकरीता ११ (अकरा) महिन्यापर्यंत आहे व कामाचे व्याप्ती प्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. कामांच्या निकडीनुसार दक्षता पथकाचे कार्यक्षेत्रात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेला तपशिल सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

अर्जदाराची नाव व सही

ठिकाण :-

दिनांक :-